| | | विहित परीक्षा शुल्क आणि निर्वाह भत्ता हा शासन निर्णयात नमुद केलेल्या पध्दतीनुसार पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.<br>९. अर्जदार विद्यार्थ्यास प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल.<br>१०. पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतल्यानंतर एखाद्या सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखाद्या शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झ ाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरीता या योजनेंतर्गत सदर विद्यार्थी लाभ मिळण्यास अपात्र राहिल.<br>११. तथापि, तदनंतर पुन:श्च त्या सत्रात / वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: उत्तीर्ण (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेतील लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.<br>१२. परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास संबंधित विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरीता कायमस्वरुपी अपात्र ठरेल.<br>१३. संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर राहणे इ. स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्यांची शुल्क शिष्यवृत्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.<br>१४. ज्या अभ्यासक्रमांकरीता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या / तिच्याकडून वसूल केली जाईल.<br>१५. लाभार्थी विद्यार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच, त्या विद्यार्थ्याला / संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासाह वसूली करण्यात येईल व कोणत्याही अन्य योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास लाभ मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल.<br>१६. सदर योजनेंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविण्याऱ्या संबंधित शैक्षणिक संस्था (NAAC, NBA इ.) इ. मुल्यांकन / पुर्नमूल्यांकन करण्यास पात्र ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरपर्यंत सक्षम शिखर संस्था / यंत्रणा / मंडळाकडून असे मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त करणे (Assessment and Accreditation) आवश्यक राहील. तद्नंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित सक्षम शिखर संस्था / मंडळाकडून (NAAC, NBA इ.) मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मानांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांचे मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये नव्याने प्रथम / थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहील. |

<table>
<tr><td>०७</td><td>आवश्यक कागदपत्रे</td><td>१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र विचारात घेऊन किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमापणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>३. उपस्थिती प्रमाणपत्र ५० टक्के पेक्षा जास्त.</td></tr>
<tr><td>०८</td><td>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप</td><td>सदर योजनेसाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता खालील प्रमाणे लाभ देय आहेत.<br><br>१. शिक्षण शुल्क :-
<table>
<tr><td rowspan="2">उत्पन्न मर्यादा</td><td rowspan="2">शुल्क प्रकार</td><td colspan="4">अभ्यासक्रम</td></tr>
<tr><td>शासकीय</td><td>अशासकीय अनुदानित</td><td>अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानित - विनाअनुदानित)</td><td>कायम विनाअनुदानित</td></tr>
<tr><td colspan="6">व्यावसायीक अभ्यासक्रम</td></tr>
<tr><td>रु. २.५० लाख पर्यंत</td><td>शिक्षण शुल्क</td><td>१०० %</td><td>१०० %</td><td>५० %</td><td>५० %</td></tr>
<tr><td>रु. २.५० लाख ते रु. ८ लाखापर्यंत</td><td>शिक्षण शुल्क</td><td>५० %</td><td>५० %</td><td>५० %</td><td>५० %</td></tr>
<tr><td colspan="6">बिगर व्यावसायीक अभ्यासक्रम</td></tr>
<tr><td>रु. ८ लाखापर्यंत</td><td>शिक्षण शुल्क</td><td>१०० %</td><td>१०० %</td><td>१०० %</td><td>१०० %</td></tr>
</table>
२. परीक्षा शुल्क :-
<table>
<tr><td>व्यावसायीक अभ्यासक्रम</td><td>शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के</td></tr>
<tr><td>बिगरव्यावसायीक अभ्यासक्रम</td><td>शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या १०० टक्के</td></tr>
</table>
३. निर्वाह भत्ता :- ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांसाठी.
<table>
<tr><td>उत्पन्न मर्यादा</td><td>अभ्यासक्रम</td><td>शैक्षणिक वर्षातील दहा महिन्याकरीता अनुज्ञेय निर्वाह भत्ता</td></tr>
<tr><td rowspan="2">रु. १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी</td><td>व्यावसायीक अभ्यासक्रम (अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूरांचे पाल्य वगळून)</td><td>रु. ३०००/-</td></tr>
<tr><td>बिगरव्यावसायीक अभ्यासक्रम</td><td>रु. २०००/-</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

# उच्च शिक्षण संचालनालया मार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती/ सवलतींचा व शिष्यवृत्ती रक्कमेचा तपशील

| उच्च शिक्षण संचालनालया मार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती / सवलतींचा तपशिल | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विषय | शासन निर्णय क्रमां क व दिनांक | तपशिल |
| राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजना | | | |
| १ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१०६३-यु, दि. १६.११.१९६४ शासन निर्णय दि. ५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु. १००/- दरमहा | मंजूर संच - १२०८<br><br>१. कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीचा अर्ज करणाया विद्यार्थ्यांस इ. १२ वी च्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक |
| २ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१४७०/१०७५-७२/एस. दि.१४.०५.१९७१ शासन निर्णय दि. ५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु. १००/- दरमहा | मंजूर संच - १०० (गणित ५० व भौतिक ५०)<br>१. विज्ञान शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले व गणित किंवा भौतिक शास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीचा अर्ज करणाया विद्यार्थ्यांस इ. १२ वी च्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक |
| ३ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१४७०/१०७५७२-एस. दि.१४.०५.१९७१शासन निर्णय दि. ५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु. १००/- दरमहा | मंजूर संच - ८० (शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव, अमरावती, औरंगाबाद,धुळे करिता प्रत्येकी २० प्रमाणे)<br><br>१. राज्यातील शासकीय विद्यानिकेतन मधून इ. १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीसाठी शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे.<br>३. अर्जासोबत कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र व शासकीय विद्यानिकेतन द्वारे प्राप्त इन्टायलमेंट कार्ड, १० वी उत्तीर्ण प्रमाणपत्राची प्रत आवश्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | एकलव्य आर्थिक सहाय्य योजना | क्र.एससीएच-१०९५/(८१) मशि-४, दि.७.२.१९९६ | संच निर्धारित नाहीत.<br><br>या योजनेअंतर्गत होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>१. विधी, वाणिज्य व कला शाखेमध्ये पदवीसाठी किमान ६० टक्के व विज्ञान शाखेसाठी ७० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>२. नुतनीकरणासाठी ५० टक्के गुण आवश्यक<br>३. पालकांची उत्पन्न मर्यादा रु. ७५०००/- पर्यत असणे आवश्यक<br>४. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>५. संबंधीत लाभार्थी कुठेही पूर्ण किंवा अर्धवेळ नोकरी करणारा नसावा.<br>पात्र विद्यार्थ्यांना नवीन मंजुरकरिता प्रथमवर्षी रु .५०००/- व नुतनीकरणासाठी दूसया वर्षी रु.५०००/- अशा प्रकारे रक्कम विद्यार्थ्यांना मंजुर केली जाते. |
| ५ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना | शिक्षण व सेवायोजन विभाग, एएफईडी १०८३/१८१६३५(२३१७) साशि-५, दि. १७.०५.१९८४ | मंजूर संच २०८<br>१. राज्यशासनाची माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेत वरचा क्रमांक मिळविणाया गुणवान विद्यार्थ्यांसाठी<br>२. नुतनीकरणासाठी कनिष्ठ स्तरांवर किमान ५५ टक्के व वरिष्ठ स्तरांवर किमान ६५ टक्के गुण आवश्यक<br>३. विविध शुल्काची प्रतिपूर्ती शासनाने मान्य केलेल्या दरानुसार केली जाईल.<br>४. इतर कोणत्याही शिष्यवृत्ती / सवलतीचा लाभ घेता येणार नाही.<br>५. पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मंजूरीबाबतचे पत्र उच्च शिक्षण संचालनालयाकडून पाठविण्यात येते. |
| ६ | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | शिक्षण व समाजकल्याण विभाग शासन निर्णय एससीएच/१०६५-यु. दि.१९.०९.१९६५ | मंजूर संच - ७६<br><br>१. राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी सदर शिष्यवृत्ती दिली जाते.<br>२.शासकीय विज्ञान संस्था / महाविद्यालये तसेच विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या आवेदनपत्रानुसार मंजूर संचाच्या प्रमाणात शिष्यवृत्ती देण्यात येते.<br>३. विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमांतील समाधानकारक प्रगती अहवालानुसार |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | शासकीय अधिसंशोधन अधिछात्रवृत्ती | शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र.एससीएच/१०८२/४१९९ विशि-३, दि.१३.०८.१९८५ | मंजूर संच - १४<br>१. राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पीएचडी करता यावी यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.<br>२. सदर शिष्यवृत्तीसाठी राज्यस्तरांवरील ३ व महाविद्यालयासाठी ११ संच<br>३. शिक्षण संचालनालयाच्या स्तरांवर गठीत केलेल्या समिती मार्फत प्राप्त आवेदन पत्रांची छाननी करुन राज्यस्तरांवरील ३ संचाची निवड केली जाते.<br>४. महाविद्यालयीन स्तरांवर प्राचार्यांनी गठीत केलेल्या समितीकडून ११ संचाची निवड केली जाते.<br>५. संबंधीत विद्यार्थ्याने पीएचडी संबंधी विद्यापीठाकडे नोंदणी करुन संबंधीत मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे.<br>६. संबंधीत छात्र कोठेही सेवेत नसावा तसेच त्याने इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.<br>७. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. |
| ८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | एससीएच/१०८२/१५११६०/२१७३/जनरल-५, दि.०७.०५.१९८३ | मंजूर संच - ०१<br>जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडून विहीत नियमानुसार निवड करुन त्या विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रीयीन विद्यार्थ्यांमधून एका विद्यार्थ्यांची निवड केली जाते. |
| ०९ | राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती भाग -२ (अल्पसंख्यांक विकास विभाग) | अविवि-२०११/प्र.क्र.४४/११/का-६,दि. १४.१०.२०११ | मंजूर संच २०००<br><br>या योजनेसाठी इयत्ता १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना भाग -२ मध्ये इयत्ता बारावी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रांसाठी प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय आहे.<br><br>सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणि शुल्क किंवा रु. ५००० यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते.<br><br>संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्यामार्फत पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खातेवर शिष्यवृत्ती रक्कम जमा करण्यात येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | एनडीएफ/१०७९/ २२२९२०/(५३७) साशि दि.१४/१/१९८५ | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र दाखल केलेल्या मेजर, नौदल, वायूदल दर्जाच्या किंवा त्यापेक्षा कमी हुद्याच्या माजी सैनिकांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात. |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | शिक्षण व सेवायोजन विभाग शानि.क्र. एमआयएस १४६५/एच, दि. २३/११/१९६५ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात. |
| १२ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७ | उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान- विना अनुदान) / कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठा अंतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता आदि लाभ शासन निर्णयाप्रमाणे देण्यात येतात.<br><br>दि. ३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर शिष्यवृत्तीसाठी लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्फान्न मर्यादा रु. ६.०० लाखावरुन रु. ८.०० लाख इतकी वाढविण्यात आलेली आहे. |

| उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनाच्या शिष्यवृत्ती रक्कमेबाबतची माहिती. | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नांव** | **शिष्यवृत्ती रक्कम** |
| १ | एकलव्य आर्थिक सहाय्य | ५०००/- रु. |
| २ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य | १. प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>२. सत्र शुल्क - १०० टक्के<br>३. भोजन शुल्क - १५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = १५०० रु.<br>४. वैद्यकीय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. १२० यापैकी जी रक्कम जास्त असेल अशी रक्कम.<br>५. परीक्षा शुल्क - १०० टक्के<br>६. शिक्षण शुल्क - १०० टक्के<br>७. ग्रंथालय शुल्क - १०० टक्के<br>८. पुस्तके व इतर स्टेशनरी साहित्य -<br>a) ११ वी, १२ वी - ३०० रु. वार्षिक<br>b) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veternary and agriculture अभ्यासक्रम वगळून) - ५०० रु. वार्षिक<br>c) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veternary and agriculture अभ्यासक्रमासाठी) - ७०० रु. वार्षिक<br>d) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम - १००० रु. वार्षिक<br>e) पदवीका अभ्यासक्रम - ५०० रु. वार्षिक<br>९. वसतीगृह शुल्क - ६०० रु. वार्षिक<br>१०. प्रयोगशाळा शुल्क - १०० टक्के<br>११. जिमखाना शुल्क - १०० टक्के |
| ३ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | २५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता २५०० रु. |
| ४ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | ७५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता ७५०० रु . तसेच १००० रु. वार्षिक सादिलवार खर्च असे एकूण ८५०० रु. वार्षिक |
| ५ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | ८००० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता ८०,००० रु. तसेच १०,००० रु. वार्षिक सादिलवार खर्च असे एकूण ९०,००० रु. |
| ६ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १०० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता १००० रु. |
| ७ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | १०० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता १००० रु. |
| ८ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | ११ वी १२ वी - १०० रु. प्रमाणे दहा महिन्याकरिता - १००० रु.<br>पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम - १५० रु. प्रमाणे दहा महिन्याकरिता -१५०० रु. |
| ०९ | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग -२) | प्रत्यक्ष शिक्षण शुल्क किंवा रु. ५००० यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम. सदर शिष्यवृत्तीची रक्कम संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते. |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | १. प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>२. सत्र शुल्क - १०० टक्के<br>३. ग्रंथालय शुल्क -१०० टक्के<br>४. प्रयोगशाळा शुल्क - १०० टकके<br>५. शिक्षण शुल्क - लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. (सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत.) |

११ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

सदर योजनेसाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता खालील प्रमाणे लाभ देय आहेत.

**१. शिक्षण शुल्क :-**

| उत्पन्न मर्यादा | शुल्क प्रकार | अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय | अशासकीय अनुदानित | अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानित - विनाअनुदानित) | कायम विनाअनुदानित |
| व्यावसायीक अभ्यासक्रम | | | | | |
| रु. २.५० लाख पर्यंत | शिक्षण शुल्क | १०० % | १०० % | ५० % | ५० % |
| रु. २.५० लाख ते रु. ८ लाखापर्यंत | शिक्षण शुल्क | ५० % | ५० % | ५० % | ५० % |
| बिगर व्यावसायीक अभ्यासक्रम | | | | | |
| रु. ८ लाखापर्यंत | शिक्षण शुल्क | १०० % | १०० % | १०० | १०० |

**२. परीक्षा शुल्क :-**

| | |
|---|---|
| व्यावसायीक अभ्यासक्रम | शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के |
| बिगरव्यावसायीक अभ्यासक्रम | शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या १०० टक्के |

३. **निर्वाह भत्ता** :- ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांसाठी.

| उत्पन्न मर्यादा | अभ्यासक्रम | शैक्षणिक वर्षातील दहा महिन्याकरीता अनुज्ञेय निर्वाह भत्ता |
|---|---|---|
| रु. १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी | व्यावसायीक अभ्यासक्रम (अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूरांचे पाल्य वगळून) | रु. ३०००/- |
| | बिगरव्यावसायीक अभ्यासक्रम | रु. २०००/- |

| | | |
|---|---|---|
| १२ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | १. प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>२. सत्र शुल्क - १०० टक्के<br>३. ग्रंथालय शुल्क -१०० टक्के<br>४. प्रयोगशाळा शुल्क - १०० टक्के<br>५. शिक्षण शुल्क - लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. (सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत.)<br>६. शिष्यवृत्ती रक्कम -<br>a) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून) - ५० रु. वार्षिक<br>b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम) - ६० रु. वार्षिक<br>७. पुस्तके व इतर खर्च -<br>a) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून) - २०० रु. वार्षिक<br>b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम) - ४०० रु. वार्षिक |

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

| अ.क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| ०१ | योजनेचे नांव | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| ०२ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७<br>२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र. ३५/तांशि-४, दि. ३१.०३.२०१८ |
| ०३ | योजनेचा उद्देश | मान्यताप्राप्त व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्याच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीचा लाभ देणे. |
| ०४ | योजना पात्रतेच्या प्रमुख अटी | १. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित असेल.<br>३. सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ शासन निर्णयामध्ये निर्धारित केलेल्या निवडक पूर्णवेळ ६०५ अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित राहील.<br>४. तसेच योजेनच्या लाभाकरीता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची व संबंधित सक्षम संस्थाची पूर्व मान्यता व संलग्नता असणे आवश्यक आहे.<br>५. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. |
| ०५ | आवश्यक कागदपत्रे | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र. |
| ०६ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप | सदर योजनेसाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क हे लाभ देण्यात येतात.<br>व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्काच्या ५० टक्के व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देय आहेत.<br>तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाठी शिक्षण शुल्काच्या १०० टक्के व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देय आहेत. |

# डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

| अ.क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| ०१ | योजनेचे नांव | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ०२ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७<br>२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र. १८५/तांशि-४, दि. १८.०६.२०१८ |
| ०३ | योजनेचा उद्देश | मान्यताप्राप्त व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अल्पभुधारक शेतकरी यांच्या पाल्यांना / नोंदणीकृत मजूर यांच्या पाल्यांना / ज्या विद्यार्थ्याच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता लाभ देणे. |
| ०४ | योजना पात्रतेच्या प्रमुख अटी | १. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित असेल.<br>३. विद्यार्थी अल्पभुधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर यांचे पाल्य किंवा विद्यार्थी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असणे आवश्यक.<br>४. सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ शासन निर्णयामध्ये निर्धारित केलेल्या निवडक पूर्णवेळ ६०५ अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित राहील.<br>५. तसेच योजेनच्या लाभाकरीता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची व संबंधित सक्षम संस्थाची पूर्व मान्यता व संलग्नता असणे आवश्यक आहे.<br>६. शासनाच्या विविध निर्वाह भत्ता योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. |
| ०५ | आवश्यक कागदपत्रे | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. अल्पभुधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर प्रमाणपत्र असणे आवश्यक किंवा,<br>३. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र. |
| ०६ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप | सदर योजनेसाठी वसतीगृह निर्वाह भत्ता लाभ देण्यात येतो. |

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.कबचौउमवि/ 08/शिष्यवृत्ती / 674 /2018 दि.04/09/2018 08

प्रति,
मा.प्राचार्य,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये /परिसंस्था
मा.संचालक / विभाग प्रमुख, सर्व शै.प्रशाळा / विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**विषय :100% केंद्र शासन पुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन 2018-19 नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :मा.संचालक तथा नोडल ऑफीसर, उच्च शिक्षण, म.रा.पुणे यांनी प्रसिध्द केलेली जाहिरात व दि.13/08/2018 चे परिपत्रक**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या जाहिरात व परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2018-19 मध्ये आपल्या महाविद्यालयातील /विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सर्व प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना **"भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन 2018-19".** या योजनेचा लाभ घेता यावा. यासाठी विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तींचे अर्ज **नविन मंजुरीचे आणि प्रथम, द्वितीय व तृतिय नुतनिकरणाचे (Fresh,1st ,2nd & 3rd Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने व शिष्यवृत्तीच्या चतुर्थ(4th) नुतनिकरणाचे (Renewal) अर्ज ऑफलाईन (Offline) पध्दतीने** मागविण्यात येत आहे.

सोबत मा.संचालक तथा नोडल ऑफीसर, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांनी प्रसिध्द केलेली जाहिरात व परिपत्रक जोडत आहोत. शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेचे पालन करुन User ID तयार करुन online अर्ज भरावा.

www.scholarships.gov.in

ऑनलाईन अर्ज करण्याच्या सविस्तर माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in यासंकेतस्थळावर प्रसिध्द जाहिरातीचे अवलोकन करावे.

महाविद्यालये / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागांनी सदर जाहिरात व परिपत्रक सन 2018-19 मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या निदर्शनात आणून देऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र असललेल्या विद्यार्थ्यांना विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व आवश्यक कागदपत्र Scan करुन ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

सदर योजनेसाठी जे पात्र विद्यार्थी शासनाने विहीत केलेल्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत. त्यांना भारत सरकारच्या **सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन 2018-19 चा लाभ घेता येणार नाही** याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(भ.भा.पाटील)
कुलसचिव

**सोबत:- वरीलप्रमाणे जाहिरात व परिपत्रक**

**प्रत माहितीसाठी**

1. मा.संचालक तथा नोडल अधिकारी, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, म.रा.पुणे -1,
2. मा.सहसंचालक, उ.शि. जळगाव विभाग जळगाव
3. मा.कुलगुरू कार्यालय, .कबचौउमवि , जळगाव
4. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि , जळगाव
5. मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि , जळगाव
6. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि , जळगाव

Z:\University Departments\Schoarship Dept\VRB\Circular reg Central Sector Scholarship 2018-19.docx

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

........................................................................

## जाहिरात

**भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०१८ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि प्रथम, द्वितीय व तृतीय नूतनीकरणाचे** (Fresh, $1^{st}$ , $2^{nd}$ & ३ $^{rd}$ Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने व शिष्यवृत्तीच्या चतुर्थ ($4^{th}$) नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑफलाईन (Offline) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत.

- **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.
६. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये केंद्र शासनाकडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून त्याचा खाते क्रमांक, आय. एफ. एस. सी. कोड अर्जामध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. तसेच नमूद बँक खाते क्रमांक हा त्याच्या आधार कार्ड क्रमांकाशी संलग्न (link) असणे आवश्यक आहे, ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास त्यांचे बँक खात्यात रक्कम जमा होणे सोईचे होईल.
७. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.
८. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्याकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक मेजर असावा व जॉईंट खाते नसावे.

९. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/ वसूल केली जाईल.

### ❖ शिष्यवृत्तीचे नूतनीकरण- Renewal

१. शिष्यवृत्तीचे नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

२. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीच्या **प्रथम, द्वितीय व तृतीय** नूतनीकरणाकरिता **(Fresh, 1st,2nd & ३rd Renewal)** विदयार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

३. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीच्या चतुर्थ नूतनीकरणाकरिता (**4th Renewal**) विदयार्थ्यांनी ऑफलाईन (Offline) पध्दतीने अर्ज सादर करावा.

४. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीचे ऑफलाईन (offline) नूतनीकरणासाठी **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द अर्ज डाऊनलोड करावा व परिपूर्णरित्या भरुन आवश्यक कागदपत्रासह महाविद्यालयाकडे दि. २०/१०/२०१८ पर्यंत जमा करावा. महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन पात्र विदयार्थ्यांचे अर्ज दि. ३१/१०/२०१८ पर्यंत संबंधित सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत.

५. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने पात्र विद्यार्थ्यांची विहीत नमुन्यातील यादी उच्च शिक्षण संचालनालयास **दि. १५/११/२०१८** पर्यंत जमा करावी. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

६. नूतनीकरणाच्या अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.

७. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक हा त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नोंदणी केल्याचे स्लीप आहे अशा विद्यार्थ्यांनी त्यावर दिलेला नोंदणी क्रमांक ऑनलाईन अर्ज करतेवेळी फॉर्म मध्ये नमुद करावा.

८. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

- **नविन मंजूरीचे आणि प्रथम, द्वितीय व तृतीय नूतनीकरणासाठी (Fresh, 1st , 2nd & ३rd Renewal) साठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व प्रथम, द्वितीय व तृतीय नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. **ऑनलाईन** अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३१/१०/२०१८** ही आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक हा त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नोंदणी केल्याचे स्लीप आहे अशा विद्यार्थ्यांनी त्यावर दिलेला ऑनलाईन अर्ज करतेवेळी फॉर्म मध्ये नमुद करावा.

५. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

६. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्यांना Application ID प्राप्त होईल. हा Application ID (आय.डी.) वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर Application ID जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदरचा Application ID विद्यार्थ्यास अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे. (अर्ज करताना महाविद्यालयाच्या यादीमध्ये आपल्या महाविद्यालयाचे नाव नसेल तर प्राचार्यांशी महाविद्यालयाच्या नावाच्या नोंदणीसाठी संपर्क साधावा.)

७. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

८. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे अर्जासोबत आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावीत.

शिष्यवृत्ती रक्कम ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) च्या खाली असणा-या विदयार्थ्यांनी अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रासोबत महाविदयालयाकडे सादर करावी व शिष्यवृत्ती रक्कम रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असणा-या विदयार्थ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे scan करुन online upload करावी.

९. ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम रु. ५०,०००/- पेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांनी अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत आवश्यक ती कागदपत्रे महाविद्यालयास पडताळणीसाठी सादर करावीत.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

११. अधिक माहितीकरिता **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावरील **scholarship section** मधील **NSP2.0** पोर्टलवरील गाईडलाईन व FAQ पूर्णपणे वाचून व समजून विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

## ❖ महाविद्यालय स्तरावर अर्ज पुढे पाठविण्याची कार्यपद्धती :

अ) विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा **प्रथम, द्वितीय व तृतीय नूतनीकरण (1st,2nd & ३rd Renewal)** चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या / अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी संबंधित महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेला युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती त्याने अर्जासोबत जोडलेल्या / अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन तपासून घ्यावी. त्यानंतर पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

ब) विद्यार्थ्यांनी चतुर्थ नूतनीकरणाकरिता (**4th Renewal**) चे ऑफलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज दि. ३१/१०/२०२०१८ पर्यंत संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयांना सादर करावेत. महाविद्यालयांनी सहसंचालक कार्यालयांकडे विहित मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी www.scholarships.gov.in (NSP2.0) हे संकेतस्थळ अवलोकन करावे. तसेच संकेतस्थळावर दिसणा-या **helpline no. 0120- 6619540** या क्रमांकावर किंवा संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. केंद्रशासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या नवीन सूचनांसाठी या संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

संबंधित विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालयांचे दूरध्वनी क्रमांक :-

| Regions | Email - ID | Land Line |
|---|---|---|
| Amravati | jdheamt@yahoo.com | 0721-25311235 |
| Nagpur | jdhengp@rediffmail.com | 0712-2554210/2561713 |
| Mumbai | jdhemumbai@gmail.com | 022-22656600/22691528 |
| Pune | jdhepune@gmail.com | 020-26127833/26051632 |
| Panvel | jdhe.pnvl-mah@gov.in | 022-27461420/27453820 |
| Aurangabad | jdheaur_2007@rediffmail.com | 0240-2331913/2322915 |
| Nanded | jdhe.nanded@yahoo.com | 02462-283144 |
| Kolhapur | jdhekop@gmail.com | 0231-2535400/2535454 |
| Jalgaon | jdhe_jal@yahoo.co.in | 0257-2238510 |
| Solapur | jtdirhesol@rediffmail.com | 0217-2350055 |

**(डॉ. धनराज माने)**
नोडल ऑफिसर तथा संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं-२०१८/सीएसएस/शिष्यवृत्ती/९०८० दि. १३/०८/२०१८

## परिपत्रक

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०१८-१९ साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे फेब्रुवारी / मार्च २०१८ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण, संचालनालय, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. सदर योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय नुतनीकरणाचे अर्ज (Fresh, 1st , 2nd & ३ rd Renewal) हे ऑनलाईन पध्दतीने चतुर्थ नूतनीकरणासाठी (4th Renewal) अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

**नवीन मंजुरी तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय नूतनीकरण (Online Renewal)** -

१) शिष्यवृत्तीच्या नवीन मंजूरी तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय नूतनीकरणासाठी (Fresh, 1st, 2nd & ३ rd Renewal) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत केंद्रशासनाने **दि. ३१/१०/२०१८** निर्धारित केलेली आहे.

२) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

३) ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक हा त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नोंदणी केल्याचे स्लीप आहे अशा विद्यार्थ्यांनी त्यावर दिलेला ऑनलाईन अर्ज करतेवेळी फॉर्म मध्ये नमुद करावा.

४) तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

५) नवीन मंजूरीचा तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय नूतनीकरणासाठी (Fresh, 1st,2nd & ३rd Renewal) ऑनलाईन अर्ज करण्याच्या विस्तृत पध्दतीसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

६) तसेच संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या सी.एस.एस. शिष्यवृत्तीबाबत सूचनांचे अवलोकन करावे.

७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय / संस्थेने छाननी करुन त्वरीत ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावे. अंतिम मुदतीची वाट पाहू नये.

Scanned by CamScanner

- **शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Offline Renewal) -**

१) शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षीच्या परीक्षेत किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
२) चतुर्थ नूतनीकरणासाठी (4th Renewal) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नूतीनकरणासाठीचा अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावा व परिपूर्णरित्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह महाविद्यालयाकडे दिनांक २०/१०/२०१८ पर्यंत जमा करावा.
३) महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र अर्ज दिनांक ३१.१०.२०१८ पर्यंत सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत.
४) संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने पात्र विद्यार्थ्यांची विहीत नमुन्यातील यादी उच्च शिक्षण संचालनालयास दि. १५.११.२०१८ पर्यंत जमा करावी.
५) सहसंचालक कार्यालयांनी संचालनालयास विहीत मुदतीत अर्ज सादर न केल्याने व संबंधित विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती रक्कम न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सहसंचालक कार्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१८-१९ च्या मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. आपल्या अधिनस्त महाविद्यालयात / संस्थेत शिक्षण घेत असणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी व बँकखाते आधार संलग्न करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अर्जदाराच्या सोयीसाठी मार्गदर्शक सूचना व अर्जाचा नमुना www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांचे स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विभाग प्रमुखांना परिपत्रकाद्वारे तसेच कार्यशाळा, बैठका आयोजीत करुन सूचना देण्यात याव्यात व सदर कार्यशाळेत सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यासाठी महाविद्यालयांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून महाविद्यालयांत कँम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. झालेल्या कार्यशाळा, बैठका आयोजित केल्याबाबतचे इतिवृत्त या संचालनालयास सादर करण्यात यावे.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

प्रत,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

Scanned by CamScanner

RENEWAL- 4th

GOVERNMENT OF INDIA

MINISTRY OF HUMAN RESOURCE DEVELOPMENT DEPARTMENT OF HIGHER EDUCATION CENTRAL SECTOR SCHEME OF SCHOLARSHIP FOR COLLEGE AND UNIVERSITY STUDENTS RENEWAL APPLICATION FOR YEAR 2018-19

| | | | |
|---|---|---|---|
| 1. Personal Information | | | |
| Name of the Students | | | |
| : Gender : | | | |
| Category : | | | |
| Contact Details : | | | |
| Permanent Address | | | |
| City : | | Pin Code: | |
| District : | | Mobile No: | |
| Email Address : | | | |
| 2. Guardian Details : | | | |
| Name : | | | |
| Occupation : | | Designation : | |
| Organization address : | | | |
| Annual Income : | | | |
| 3.Course Details: | | | |
| Course Name: | | Course Year : | |
| 4.College Details | | | |
| College Name: | | | |
| College Address: | | | |
| Pin code: | | | |
| E-mail Address: | | Contact No : | |
| 5.Exam Details: | | | |
| Is Promoted To Next Class? | | | |
| Percentage Obtained in Annual / Semester Exam : | | | |
| Discipline Remarks of Students (Ragging Etc): | | | |
| State Board Exam of Class XII: | | | |
| HSC Seat No: | | HSC Passing Year : | |

| 6.Other Scholarship Details: | | | |
|---|---|---|---|
| Is the Candidate In Receipt of Any Scholarship From State Govt OR other Institution? | YES / NO: | | |
| 7.Bank Details: | | | |
| Bank Name: | | | |
| Branch Name: | | | |
| Address: | | | |
| Contact No: | | | |
| IFSC Code: | | MICR Code: | |
| Account No: | | | |
| Aadhaar No (if any): | | | |

Signature of
The Principal/Head
Of the Institute with College Seal

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## वित्त विभाग

जा.क्र.कबचौउमवि/08/शिष्यवृत्ती /578/2019 दि.26/08/2019

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)

**प्रति,**

**मा.प्राचार्य,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये /परिसंस्था**

**मा.संचालक / विभाग प्रमुख, सर्व शै.प्रशाळा / विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

**विषय** : 100 टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन 2019-20 साठी अमंलबजावणी करणे बाबत.

**संदर्भ :** मा.संचालनालयाचे पत्र क्र उशिसं-2019/सीएसएस/शिष्यवृत्ती/10925 दि.22/08/2019

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाचे संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2019-20 मध्ये आपल्या महाविद्यालयातील / संस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सर्व प्रवेशीत पात्र विद्यार्थ्यांना "100 टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन 2019-20" या शिष्यवृत्तीचा लाभ घेता यावा यासाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील (www.scholarships.gov.in) या संकेत स्थळावर नवीन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन(Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले शिष्यवृत्ती अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नसल्याने जे विद्यार्थी विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना केंद्रपुरस्कृत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही.

वरील प्रमाणे संदर्भिय परिपत्रक सोबत जोडलेले असून सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/ विभागातील सन 2019-20 मध्ये प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून देवून शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत व आवश्यकते सर्व कागदपत्र Scan करुन upload करणेबाबत सुचना देण्यात याव्यात.

तसेच सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या महाविद्यालयातील / संस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सन 2019-20 मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) अर्ज सोबत जोडलेल्या संचालनालयाच्या संदर्भिय परिपत्रकानुसार अटी व शर्ती प्रमाणे विहीत मुदतीत ऑनलाईन भरून घेवून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रकांसह महाविद्यालयाकडे प्राप्त करुन घेवून त्वरीत विहित मुदतीच्या आत ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत. तसेच विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील विद्यार्थ्यांचे अर्ज वित्त विभागातील शिष्यवृत्ती कक्षात तपासणी करुन विभागप्रमुखांच्या शिफारशीसह तात्काळ पाठवावे. ही विनंती.

**सोबत:- उपरोक्त संदर्भिय पत्र**

आपला विश्वासू,

26.8.19

(प्रा.डॉ.अ.बा.चौधरी)
प्र. कुलसचिव

**प्रत माहितीसाठी**

1. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण मध्यवर्ती इमारत, म.रा.पुणे -1,
2. मा.सहसंचालक, उ.शि. जळगाव विभाग जळगाव
3. मा.कुलगुरू कार्यालय, .कबचौउमवि , जळगाव
4. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि , जळगाव
5. मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि , जळगाव
6. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि , जळगाव.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune.gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ /२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं-२०१९/सीएसएस/शिष्यवृत्ती/ 10925 दि. /०८/२०१९ 22 AUG 2019

**परिपत्रक**

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०१९-२० साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) अर्ज ऑनलाईन **(Online)** पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे.

### ❖ किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

### ❖ अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-

- **नवीन मंजूरी** / (Fresh)-

  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.

  २. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

Scanned with CamScanner

- **नूतनीकरण (Renewal)-**

१. मागील वर्षाची गुणपत्रिका.

❖ **<u>नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-</u>**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३०/११/२०२१** ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम **दिनांक १५.१२.२०२१** हा आहे.

३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top २०th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोकड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

८. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील

९. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

११. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

❖ **विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-**

१. NSP पोर्टल द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तरी सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय /संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रीया NSP Portal च्या HOME Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (KYC करण्याबाबतची प्रक्रीया याची सविस्तर माहिती <u>www.dhepune.gov.in</u> या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

Scanned with CamScanner

२. विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. संबंधित महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

तरी आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सूचना देण्यात याव्यात. व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयं, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

Scanned with CamScanner

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.**

# जाहिरात

## भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एन.एस.पी. पोर्टलवरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.** नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

नवीन मंजूरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ करीता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal)अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| अ.क्र | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | | **नवीन शिष्यवृत्ती** (Fresh) **व नूतनीकरण शिष्यवृत्ती** (Renewal) |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३० नोव्हेंबर, २०२१ |
| २ | महाविद्यालयाने अर्जांची ऑनलाईन पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक | १५ डिसेंबर, २०२१ |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावते.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी **www.scholarships.gov.in** हे संकेतस्थळ अवलोकन करावे. तसेच संकेतस्थळावर दिसणाऱ्या **Helpline No. 0120-6619540** या क्रमांकावर किंवा **helpdesk@nsp.gov.in** या ई-मेल वरुन संपर्क साधावा. तसेच उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील **दूरध्वनी क्रमांक 020-26126939 / 29707098** वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. **केंद्रशासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या नवीन सूचनांसाठी या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in व www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.**

**(सदर शिष्यवृत्तीबाबतची सविस्तर जाहिरात संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)**

(डॉ.धनराज माने)
नोडल ऑफिसर तथा संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

**No. D-12011/09/2021-DBT**
**Government of India/ भारत सरकार**
**Cabinet Secretariat/ मंत्रिमंडल सचिवालय**
**DBT Mission/ प्रत्यक्ष लाभ अंतरण मिशन**

4th Floor, Shivaji Stadium Annexe
Rajiv Chowk, New Delhi- 110001
Dated: August 17, 2021

## OFFICE MEMORANDUM

**Subject: NSP Timelines for AY 2021-22.**

The undersigned is directed to refer to the meeting held under the Chairmanship of Joint Secretary (DBT), Cabinet Secretariat on 11th August, 2021 on the above-mentioned subject wherein it was decided to recommend timelines on NSP for AY 2021-22 for approval of the Competent Authority (Para 6 of the Minutes of the Meeting refers). The Competent Authority has approved the following timelines on NSP for AY 2021-22: -

| | |
|---|---|
| Opening of Portal for accepting applications | 18th August, 2021 |
| Closing of Portal for accepting Pre-Matric applications | 15th November, 2021 |
| Closing of Portal for accepting Post-Matric applications | 30th November, 2021 |
| Closing of First level verification | 15th December, 2021 |
| Closing of Second level verification | 31st December, 2021 |

(Ravi Ranjan)
Under Secretary (DBT)
Tele. 23343860 Extn: 363

To,

1. Secretary, D/o Higher Education
2. Secretary, D/o Social Justice & Empowerment
3. Secretary, M/o Minority Affairs
4. Secretary, M/o Tribal Affairs
5. Secretary, D/o Empowerment of Persons with Disabilities
6. Secretary, D/o School Education & Literacy
7. Secretary, M/o Labour & Employment
8. Chairperson, Welfare & Rehabilitation Board, MHA
9. Director General, Railways Protection Force
10. Secretary, UGC
11. Chairman, AICTE
12. Secretary, M/o Electronics & IT
13. CEO, UIDAI
14. Controller General of Accounts.
15. Director General, NIC
16. Secretary, UGC
17. Chairman, AICTE

Copy for information to: -

3. PSO to Secretary (Coord), Cabinet Secretariat

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

**वित्त विभाग (शिष्यवृत्ती)**

**जा.क्र.कबचौउमवि /०८/ शिष्यवृत्ती /२०२२-२३ /** ९४८ **दि. ०९/१२/२०२२**

**(कालमर्यादित)**

**प्रती,**
**मा.संचालक / विभाग प्रमुख,**
**सर्व शैक्षणिक प्रशाळा / विभाग,**
**कवयित्री बहिणाबाई चौधारी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

**विषय : महाडीबीटी पोर्टल वरील सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेले शिष्यवृत्ती अर्ज (हार्ड कॉपी) सादर करणेबाबत.**

**संदर्भ : १) कबचौउमवि /०८/शिष्यवृत्ती /महाडीबीटी /२०२२-२३/८२२ दि. १३/१०/२०२२ चे परिपत्रक**

**२) मा. सहाय्यक आयूक्त, समाज कल्याण जळगाव यांचे पत्र क्र./ सआसक /भासशि /शिष्यवृत्ती / प्रलंबित अर्ज / अटी - शर्ती / ५१७३ / २०२२-२३ / जळगाव. दि. ०२/१२/२०२२**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावरील महाडीबीटी पोर्टलवरील सर्व प्रवर्गातील विविध प्रकारच्या शिष्यवृत्तींसाठी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची सुविधा दि. २१/०९/२०२२ पासून देण्यात आलेली असल्याचे व आपल्या शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सन २०२२-२३ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी सुचित करण्याविषयी कळविण्यात आलेले आहे.

महाडीबीटी पोर्टलवरील सर्व प्रवर्गातील विविध प्रकारच्या शिष्यवृत्तींसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची प्रत (हार्ड कॉपी) आपल्यास्तरावर पात्र विद्यार्थ्यांची तसापणी करून शिष्यवृत्ती अर्ज पडताळणी करून सर्व आवश्यक कागदपत्रे जुळवून आपल्या शिफारशींसह (हजेरी अहवालासह) शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन पडताळणी करणेसाठी दि. १६.१२.२०२२ पूर्वी शिष्यवृत्ती विभागाकडे जमा करावे. तसेच सोबत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी सुचना, शिष्यवृत्ती योजना माहीती व ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जा सोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे यांची यादी जोडलेली आहे. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांना अवगत करून नोटीस बोर्डवर सुचना लावून whatsapp द्वारे विद्यार्थ्यांना सुचित करावे, ही विनंती, कळावे.

**टिप:** बी. टेक, एम. टेक., एम.सी.ए., एम.बी.ए. या अभ्यासक्रमांचे शिष्यवृत्ती अर्ज संबंधीत विभागांनी त्यांच्या कडील क्लर्क लॉगीन व प्राचार्य लॉगीन मधून मुदतीच्या आत पडताळणी करून सर्व शिष्यवृत्ती अर्ज आपल्या विभागात सुरक्षित ठेवावे.

**आपला विश्वासू,**

**(डॉ. विनोद प्र. पाटील)**
**कुलसचिव**

**सोबत:-** १. संदर्भिय पत्र क्र. १ व २
२. विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना
३. शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाचे आवश्यक कागदपत्रांची यादी.

**प्रत माहितीसाठी**

१. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
२. मा. प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
3. मा. प्र.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.

जा.क्र.कबचौउमवि / ०८ / शिष्यवृत्ती / महाडिबीटी / २०२२-२३ / 822 दि.१३/१०/२०२२

(अत्यंत महत्वाचे शिष्यवृत्ती प्राधान्य)

प्रति,
मा.प्राचार्य / मा. संचालक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था
मा.संचालक / विभाग प्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

विषय :- शै.वर्ष सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत व शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे विविध शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी करणेबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, शै.वर्ष सन २०२२-२३ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगाव. संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्था व विद्यापिठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग अंतर्गत प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ ... वर्षात प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी मा. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजना, तंत्र शिक्षण संचालनालय विभागांतर्गत योजना, आदिवासी विकास विभागांतर्गत योजना, सामाजिक न्याय विभागांतर्गत योजना व वि.जा.भ.ज, इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागांतर्गत योजना S.C. / S.T. / V.J.N.T. / S.B.C. / O.B.C. / S.E.B.C. / E.W.S. / General/Open या सर्व प्रवर्गातील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टल वरून (www.mahadbtmahait.gov.in) या संकेतस्थळावर विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन शिष्यवृत्तीचे नवीन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज भरण्याची सुविधा दि. २१/०९/२०२२ पासून देण्यात आलेली आहे.

वरील बाबतीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणीक प्रशाळा / विभागांनी सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन शिष्यवृत्ती नियम व अटी नुसार पात्र विद्यार्थ्यांना विहीत मुदतीत महाडीबीटी पोर्टल वर (www.mahadbtmahait.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत सुचना नोटीस बोर्डवर तथा बॅनर स्वरूपात लावून सुचना देण्यात याव्यात.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करतांना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे मुळ कागदपत्रावरून Scan करूनच ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

महाडीबीटी पोर्टलवरील सर्व विविध योजनांसाठी जे पात्र विद्यार्थी विहीत केलेल्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना सन २०२२-२३ साठी संबंधीत शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

म. कळावे

आपला विश्वासु

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव,
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रत माहितीसाठी
१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव, विभाग जळगाव.
२. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
३. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि जळगाव.
४. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
५. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौ उमवि, जळगाव.

उमविनगर, जळगाव – ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७–२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७–२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# MAHADBT PORTAL SCHOLARSHIP

## (www.mahadbtmahait.gov.in)

## Year २०२२ - २३

## विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जासोबत पडताळणी करण्यासाठी सादर करावयाची आवश्यक कागदपत्रांची यादी

०१ विद्यापीठाचे प्रवेश प्रमाणपत्र. (Admission Confirmation Letter) (Acknowledgement Cum receipt of Confirmation of Admission through CAP) छायांकीत प्रत.

०२ तहसीलदार प्रमाणीत उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्र (उत्पन्नाचा दाखला) सन २०२१-२२ जोडावे. (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्न) (वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला जोडावा व वडिलांचे मृत्यूचे प्रमाणपत्र जोडावे) स्त्री उमेदवार बाबतीत लग्न झाले असल्यास पति च्या उत्पन्नाचा दाखला जोडावा.

०३ एस.एस.सी. (१०वी), एच.एस.सी. (१२वी / (डीप्लोमा), पदवी परीक्षेची गुणपत्रीका छायांकित प्रती.

०४ मागील शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या अभ्यासक्रमाच्या वर्षाची गुणपत्रिका छायांकीत प्रत.

०५ गॅप असल्यास गॅप ॲफिडेव्हीट (मुळ प्रत).

०६ चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याची फी पावती (Fee Invoice) छायांकीत प्रत, बोनाफाईड सर्टिफिकेट मुळ प्रत. (ऑनलाईन एकत्रीत अपलोड करावे).

०७ राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र हे प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्यासाठीच दिलेले असावे (Domecile State Maharashtra) छायांकीत प्रत.

०८ जात प्रमाणपत्र (Caste Certificate) छायांकीत प्रत. आणि
नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र VJNT/SBC/OBC प्रवर्गाकरता फक्त.

०९ जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) (व्यावसायिक) अभ्यासक्रमांसाठी आवश्यक छायांकीत प्रत.

१० आधार कार्ड छायांकीत प्रत.

११ आधार संलग्नीत बँक खात्याच्या पासबूक ची छायांकीत प्रत व आधार सिडेड फॉर्म.

१२ प्रतिज्ञा पत्र (मुले / मुली), विद्यार्थी व पालक यांचे स्वाक्षरी असलेले.

१३ रेशन कार्ड छायांकीत प्रत.

१४ उपस्थिती प्रमाणपत्र (हजेरी अहवाल). (७५% पेक्षा जास्त) मुळ प्रत.

१५ वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृह अधिक्षकांचे प्रमाणपत्र. मुळ प्रत.

१६ नविन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतांना (प्रथम वर्षासाठी) जोडलेले मागील अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे (लीव्हींग सर्टिफीकेट / ट्रांन्सफर सर्टिफीकेट) छायांकीत प्रत.

१७ इतर आवश्यक प्रमाणपत्र.

**वरिल सर्व कागदपत्रांची self attested छायांकीत प्रत शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

**महत्वाचे :** महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना वरिल प्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रे ओरिजनल कागदपत्रांवरून स्कॅन कॉपी करून (JPEG, JPG किंवा PDF २५६ के.बी. च्या आत) सुस्पष्ट स्वरूपात वाचता येतील व दिसतील असे अपलोड करणे आवश्यक आहे.

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६

Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429

Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## MAHADBT PORTAL SCHOLARSHIP (www.mahadbtmahait.gov.in)

## Year २०२२ - २३

## सर्व विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी पोर्टलवर विविध शिष्यवृत्तीसाठी सर्व प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीच्या आत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना सर्व आवश्यक कागदपत्रे ओरिजीनल सर्टिफिकेट वरून स्कॅन कॉपी (Jpeg, jpg किंवा pdf स्वरूपात २५६ kb च्या आत) अपलोड करावेत.
फि पेड ऑप्शन मध्ये अपडेट फी ०.०० करावी व पुर्ण फीचे Fee Invoice व बोनाफाईड सर्टिफीकेट अपलोड करावे.

शै. वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यापीठ शैक्षणिक विभागात प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नवीन (Fresh) अर्जा सोबत तहसीलदार प्रमाणीत उत्पन्नाचे मुळ प्रमाणपत्र सन २०२१-२२ या वर्षाचे जोडणे आवश्यक आहे. (प्रमाणपत्र वैध दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत)

अर्ज नुतनीकरण करणाऱ्या द्वितिय, तृतीय व चतूर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांनी (मागील शैक्षणिक वर्षात महाडीबीटी पोर्टलवर नवीन Fresh शिष्यवृत्ती अर्ज (प्रथम वर्षासाठी) भरलेल्या व नुतनीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी) अभ्यासक्रमास प्रवेशित वर्षाचा तहसीलदार प्रमाणीत उत्पन्नाच्या दाखल्याची छायांकीत प्रत जोडावी.

शैक्षणीक वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील (CAP ROUND) मधून प्रवेश घेतलेल्या SC, ST, VJNT, SBC, OBC, SEBC, EWS, Open/General या सर्व प्रवर्गातील प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षातील व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज **http://mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन भरून त्यासोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जुळवून आपआपल्या शैक्षणिक प्रशाळा / विभागात मा. संचालक / विभाग प्रमुख, यांच्या शिफारशींसह सही शिक्क्यांनिशी तात्काळ जमा करावेत.

**विशेष बाब :-**

१) सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात वरील शिष्यवृत्ती अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी इतर कुठल्याही (दुसऱ्या) प्रकारची शिष्यवृत्ती साठी अर्ज केलेला नसावा / शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.

२) सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात विद्यपीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागात प्रवेशित विद्यार्थ्यांनी यापूर्वी पदवी अथवा पदव्यूत्तर अभ्यासक्रमास इतर कोणत्याही महाविद्यालयात अथवा विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागात प्रवेश घेवुन अभ्यासक्रम पूर्ण अथवा अपूर्ण केलेला असेल आणि त्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरून शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल तर पुनश्च शिष्यवृत्ती अर्ज भरता येणार नाही. शिष्यवृत्तीचा लाभ घेतला नसल्यास तसे संबंधीत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांचे कडून त्या संबंधीत अभ्यासक्रमास प्रवेशित असतांना शिष्यवृत्तीचा लाभ घेतला नाही असे NOC LETTER शिष्यवृत्ती अर्जा सोबत जोडावे.

**आदेशावरून - -**

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६

Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429

Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय जळगांव
डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मायादेवी मंदिरासमोर महाबळ रोड, जळगांव
Email ID :acswojalgaon@gmail.com फोन नं.-०२५७-२२६३३२८/२९

जा.क्र./सआसक/भासशि/ शिष्यवृत्ती/प्रलंबितअर्ज/अटी-शर्ती/ /२०२२-२३/जळगांव दि. २.१२.२०२२

5173

प्रति,
प्राचार्य
-----------------------------
-----------------------------

**विषय- सन २०२२-२३ कतिा भारत सरकार मॅटीकोत्तर शिष्यवृत्ती योजना/फ्रि शीप योजनांतर्गत महाडीबीटी प्रणालीवरिल महाविद्यालय स्तरावरिल प्रलंबित अर्ज निकाली काढणे तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार शिष्यववृत्ती योजनांच्या अर्जावर काटेकोरपणे कार्यवाही करणेबाबत..**

संदर्भ- १.सामाजिक न्याय व विशंष सहाय्य विभाग शासन निर्‍णय दिनांक ०१ नोव्हेंबर २००३
२. सामाजिक न्याय व विशंष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक २९ मे २००३
३. सामाजिक न्याय व विशंष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ०९ जून २००३
४.सामाजिक न्याय व विशंष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ०१ जुलै २००५
५.सामाजिक न्याय व विशंष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ३१ जुलै २००८
६.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ३१ मार्च २०१६
९.सामाजिक न्याय व विशंष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ०८ जानेवारी २०१९
१०.सामाजिक न्याय व विशंष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ०१ ऑगस्ट २०१९
११.इमाव बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय दिनांक ३ मार्च २०२०

उपरोक्त विषयान्वये आपणास अवगत करण्यात येते कि, सन २०२२-२३ करिता अनु.जाती/विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गाचे भारत सरकार मॅटीकोत्तर शिष्यवृत्ती योजना/फ्रि शीप ई.योजनांतर्गत महाडीबीटी प्रणालीवरिल सन २०२२-२३ या नवीन सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षाकरिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याची कार्यवही सुरू झालेली आहे.

तेव्हा अर्जांबाबत शासन निर्णयातील नमूद अटी शर्तीनुसार सन २०२२ -२३ करिता शिष्यववृत्ती योजनांच्या अर्जावर काटेकोरपणे कार्यवाही करण्यात येवून परिपुर्ण ऑनलाईन अर्ज या कार्यालयास सादर करावेत. तसेच ऑनलाईन सादर केलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह आपल्या दप्तरी ठेवण्यात यावेत व नियमित कार्यालयीन तसेच मा.महालेखापालांकडील लेखापरिक्षणाच्या तपासणी वेळी महाविदयालयाच्या शिष्यवृत्तीच्या बँक खात्याच्या तपशिलासह उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी महाविदयालयांची राहील.

तसेच अनु.जाती/विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गाचे भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना/फ्रि शीप योजनांतर्गत महाडीबीटी प्रणालीवरिल महाविदयालय स्तरावरिल प्रलंबित अर्ज विहित मुदतीत सादर न केल्यास मागासवर्गीय विदयार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त
समाज कल्याण जळगांव

प्रत माहितीस्तव सविनय सादर
१.मा.आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
२.मा.संचालक,बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
३.मा. प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग, नाशिक.

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त
समाज कल्याण जळगांव

Scanned by CamScanner

## मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रिशीप बाबतचे विहित अटी, शर्ती शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचना

१.भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (केंद्र शासन मान्य अभ्यासक्रमांना )व फ्रिशीप अनुसूचित जाती, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच लागू राहील.

२.सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी भारतीय असावा व तो महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

३.सदर विद्यार्थी मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमातील ज्या वर्षात शिकत होता, ती परीक्षा त्याने उत्तीर्ण केलेली असावी.

४.शिष्यवृत्ती/फ्रि-शीप करिता एका विद्यार्थ्यास एकाच अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंत शिष्यवृत्ती देय राहील. एका विदयार्थ्यांस एकच अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंत शिष्यवृत्ती लागू राहील.उदा.११ वी, १२ वी,कला बी.ए,.एम.ए.ई. परंतु एखादया विदयार्थ्याने बी.ए नंतर बी.एड हा अभ्यासक्रम पुर्ण केला आणि नंतर त्याने एमए साठी प्रवेश घेतल्यास एमए कोर्स करिता शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही परंतू बी..एड. नंती एमबीए ला प्रवेश घेतल्यास तो व्यवसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रम असल्यमुळे त्यास शिष्यवृत्ती मंजूर करता येईल. एका विदयार्थ्यांस दोन व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती लागू राहील. व्यवसायिक अभ्यासक्रम पुर्ण करून व्यवसायिक अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

५.शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ज्या अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती घेतलेली आहे, तो अभ्यासक्रम त्याने पुर्णकेलेला पाहीजे. जर तो अभ्यासक्रम त्याने अर्धवट सोडून दुस ऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला तर त्यालादुसऱ्या अभ्यासक्रमाचीशिष्यवृत्ती देय होणार नाही. तसेच प्रदान केलेली रक्कम व्याजासह वसूल केली जाईल.

६.व्यवसायिक अभ्यासक्रमांकरिता विद्यार्थ्यांचा प्रवेश कॅप मार्फत झालेला असावा.

७ शिष्यवृत्तीसाठी अनुसूचित जाती करीता उत्पन्न मर्यादा २.५ लक्ष तसेच फ्रिशीपसाठी मर्यादा नाही.

८.इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गाकरीता शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा १.५० लक्ष तसेच फ्रिशीपसाठी ८.०० लक्ष आहे.

९.सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला. विदयार्थ्याचे पालक नोकरीत (दोन्ही पालक) असल्यास तेथील उत्पंन्नाचा दाखला (फॉर्म नं १६) व इतर मार्गानी मिळणारे उत्पंन्न.

१०.मुळ शाळा सोडल्याचा दाखला / मुळ टि.सी. मुळ टि.सी.शिवाय शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येवू नये.

११.जातीचा दाखला सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला असावा.

१२.जातवैधता प्रमाणपत्र व्यवसायिक अभ्यासक्रमाकरिता.

१३. अधिवास दाखला.

१४.मागील वर्षाचे उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक

१५.विद्यार्थीनीच्या बाबतीत (मुलीचे ) लग्न झाले असल्यास पतीचा उत्पन्न दाखल जोडण्यात यावा, व विवाहाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

१६.वडील हयात नसल्यास वडीलांचा मृत्यू दाखला जोडवा.

१७.शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे गॅप प्रमाणपत्र व शपथपत्र

१८. व्यवसायिक अभ्यासक्रमात प्रवेशित विदयार्थी निर्वाह भत्त्याकरिता पात्र असून स्थानिक विदयार्थी याकरिता पात्र नाही.विद्यार्थी खाजगी किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र, सदर वसतिगृहात प्रवेश दिल्यापासून निर्वाह भत्ता देता येईल. परंतु सदर वसतिगृहात निवासाची व भोजनाची अशी दोन्ही प्रकारची सुविधा असणे आवश्यक आहे. त्याबाबत प्राचार्याने खात्री करुन प्रमाणित करावे. तथापि त्याठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास संबंधित वसतीगृह अधिक्षकांकडून प्रमाणित करण्यात यावे.तदनंतर शासकिय वसतीगृहात प्रवेश देण्यात येईल.

१९. कॅप लेटर (ज्या अभ्यासक्रमांना आवश्यकत आहे त्यांच्यासाठी) प्राचार्यांकडून स्वाक्षंकित व प्रमाणित.

२०.फी पावती किंवा बोनाफाईड.

२१. विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गाकरिता दोनच अपत्यांकरिता सदर योजना लागू राहील.सदरची अट मंर्लीना लागू नाही.(लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र)

२२.१० वी ,१२ वी, पदवी इ. चे मार्कशीट व सदर अभ्यासक्रमांमध्ये गॅप पडलेला असल्यास गॅप प्रमाणपत्र.

२३. शिष्यवृत्ती/फ्रि-शीप करिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १५.०४.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यनुसार आधार संलग्न बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली स्थापित करणे संबंधित शैक्षणिक संथेस बंधनकारक असून अशा

Scanned by CamScanner

प्रणालीवर दैनंदिन उपस्थिती नोंदविणे आवश्यक राहील व उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निश्चित केल्यानुसार किमान उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ देय राहील.सत्रातील विद्यार्थ्यांची हजेरी ७५% पेक्षा जास्त असलेबाबतचे प्रमाणपत्र प्राचार्यांकडून स्वाक्षांकित व प्रमाणित.

२४.नॉन-क्रिमीलेयर विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गाकरिता.

२५. आधार व मोबाईल क्र. बँकेला लिंक असलेबाबतचे प्रमाणपत्र.

२६. फ्रि शीप/शिष्यवृत्ती योजना फक्त शासकिय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच लागू राहील.

२७.फ्रि शीप करिता तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका,पदवी,पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा लाभ CAP व्दारे प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांनाच लागू राहील.मात्र सदर प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यनंतर रिक्त राहीलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

२८. फ्रि शीप करिता थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश या योजनेचा लाभ CAP व्दारे प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांनाच लागू राहील.मात्र सदर प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यनंतर रिक्त राहीलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

२९.शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकि केवळ कोणत्याही एकाच योजनेचा लाभ् मिळण्यारस संबंधित विद्यार्थी पात्र असेल.

३०. फ्रि शीप करिता एकुण अभ्यासक्रमाच्या एकुण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पुर्णतः अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढिल शैक्षणि वर्षाकरिता प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या उर्वरित कालावधी साठी सदर योजनंतर्गत लाभाकरिता कायमस्वरूपी अपात्र ठरेल.

३१.लाभार्थी विद्यार्थी व संबंधित शैक्षणिक संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्याअर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित कालावधीसाठी लाभ देय राहणार नाही. तसेच सदर संपूर्ण रक्कमेची व्याजासह वसूली केली जाईल.

**३२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ३१ जुलै २००८ अन्वये अनुसूचित जाती, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील खालील नमूद अभ्यासक्रमात प्रवेशित विदयार्थ्यांना शुल्क प्रतिपुर्तीकरिता जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य राहील.**

**१.उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत असलेले पदविका अभ्यासक्रमांकरिता-**
**अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र,एम.एच.सी.टी.**

**२.कृषी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यविकास विभागा्रतर्गत पदविका,पदवी,पदव्युत्तर तसेच बी.एस.सी.(जैवतंत्रज्ञान)**

**३.इ.१० वी ची शालांत परिक्षा उत्तीर्ण होयुन महाराष्ट्र राज्य् तंत्रशिक्षण मंडळाचा पुर्णवेळ अभ्यासक्रमात प्रवेशित विदयार्थी**

३३.नर्सिंग कोर्सला ए.एन.एम/जी. एन.एम करिता फक्त शिष्यवृत्ती (अनु.जाती प्रवर्गाकरिता) देय आहे.

३४. बी.एस.सी कंम्पयुटर करिता फक्त शिष्यवृत्ती/फ्रि-शीप (अनु.जाती प्रवर्गाकरिता) देय आहे.

३५.महाविदयालयास मान्य संस्थेच्या अधिन राहूनच शिष्यवृत्ती देय राहील.

३६.प्रत्येक लाभार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विदयार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीव्दारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

३७.सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यवसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी सक्षम शिखर संस्थेकडून मुल्यांकन व दर्जाचे मानांकन ( ASSESMENT AND ACCREDIATATION) प्राप्त करणे बंधनकारक आहे.

३८.अभिमत अथवा खाजगी स्वयं अर्थ सहाय्यीत विदयापिठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांना लागू राहणार नाही.

Scanned by CamScanner

३९.शासकिय औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमधील केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या अनु.जाती/विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गाकरिता प्रवर्गातील विदयार्थ्यांना व्यवसाय शुल्क प्रतिपुर्ति योजना लागू राहील.

उपरोक्त नमूद सर्व प्रमाणपत्रे,जातीचे दाखले, जातीचे वैधता प्रमाणपत्र, गुणपत्रक ई सर्व दाखले मुळ कागदपत्रे अपलोड करण्यात यावीत तसेच विदयार्थ्यांची प्रोफाईल आधार संलग्न असावी व आधार व मोबाईल क्र. बँकेला लिंक करणे अनिवार्य आहे.

**शिष्यवृत्ती व फ्रिशीपचे अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे.**

- १.सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला. विदयार्थ्याचे पालक नोकरीत असल्यास तेथील उत्पंन्नाचा दाखला (फॉर्म नं १६) व इतर मार्गानी मिळणारे उत्पंन्न.
- २.मुळ शाळा सोडल्याचा दाखला / मुळ टि.सी. मुळ टि.सी.शिवाय शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येवू नये.
- ३.जातीचा दाखला सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला असावा.
- ४.जातवैधता प्रमाणपत्र व्यवसायिक अभ्यासक्रमाकरिता.
- ५. अधिवास दाखला.
- ६.मागील वर्षाचे उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक
- ७.विद्यार्थीनीच्या बाबतीत (मुलीचे ) लग्न झाले असल्यास पतीचा उत्पन्न दाखल जोडण्यात यावा, व विवाहाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
- ८.वडील हयात नसल्यास वडीलांचा मृत्यू दाखला जोडवा.
- ९.शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे गॅप प्रमाणपत्र व शपथपत्र
- १०. विद्यार्थी खाजगी किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र, सदर वसतिगृहात प्रवेश दिल्यापासून निर्वाह भत्ता देता येईल. परंतु सदर वसतिगृहात निवासाची व भोजनाची अशी दोन्ही प्रकारची सुविधा असणे आवश्यक आहे. त्याबाबत प्राचार्याने खात्री करुन प्रमाणित करावे.
- ११. कॅप लेटर (ज्या अभ्यासक्रमांना आवश्यकत आहे त्यांच्यासाठी) प्राचार्यांकडून स्वाक्षंकित व प्रमाणित.
- १२.फी पावती किंवा बोनाफाईड.
- विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गाकरिता दोनच अपत्यांकरिता सदर योजना लागू राहील.सदरची अट मंर्लीना लागू नाही.(लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) १४.१० वी ,१२ वी, पदवी इ. चे मार्कशीट व सदर अभ्यासक्रमांमध्ये गॅप पडलेला असल्यास गॅप प्रमाणपत्र.
- १५.सत्रातील विदयार्थ्यांची हजेरी ७५% पेक्षा जास्त असलेबाबतचे प्रमाणपत्र प्राचार्यांकडून स्वाक्षंकित व प्रमाणित.
- १६.नॉन-क्रिमीलेयर विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गाकरिता.
- १७. आधार व मोबाईल क्र. बँकेला लिंक असलेबाबतचे प्रमाणपत्र.
- उपरोक्त नमूद सर्व प्रमाणपत्रे,जातीचे दाखले, जातीचे वैधता प्रमाणपत्र, गुणपत्रक ई सर्व दाखले मुळ कागदपत्रे अपलोड करण्यात यावीत तसेच विदयार्थ्यांची प्रोफाईल आधार संलग्न असावी व आधार व मोबाईल क्र. बँकेला लिंक करणे अनिवार्य आहे.

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त
समाज कल्याण जळगांव

Scanned by CamScanner

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.कबचौउमवि / ०८ / शिष्यवृत्ती / महाडिबीटी / २०२२-२३ / 822 दि.१३/१०/२०२२

(अत्यंत महत्वाचे शिष्यवृत्ती प्राधान्य)

प्रति,
मा.प्राचार्य / मा. संचालक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था
मा.संचालक / विभाग प्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

विषय :- शै.वर्ष सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत व शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे विविध शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी करणेबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, शै.वर्ष सन २०२२-२३ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगाव. संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्था व विद्यापिठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग अंतर्गत प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ ... वर्षात प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी मा. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजना, तंत्र शिक्षण संचालनालय विभागांतर्गत योजना, आदिवासी विकास विभागांतर्गत योजना, सामाजिक न्याय विभागांतर्गत योजना व वि.जा.भ.ज, इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागांतर्गत योजना S.C. / S.T. / V.J.N.T. / S.B.C. / O.B.C. / S.E.B.C. / E.W.S. / General/Open या सर्व प्रवर्गातील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टल वरून (www.mahadbtmahait.gov.in) या संकेतस्थळावर विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन शिष्यवृत्तीचे नवीन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज भरण्याची सुविधा दि. २१/०९/२०२२ पासून देण्यात आलेली आहे.

वरील बाबतीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणीक प्रशाळा / विभागांनी सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन शिष्यवृत्ती नियम व अटी नुसार पात्र विद्यार्थ्यांना विहीत मुदतीत महाडीबीटी पोर्टल वर (www.mahadbtmahait.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत सुचना नोटीस बोर्डवर तथा बॅनर स्वरुपात लावून सुचना देण्यात याव्यात.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करतांना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे मुळ कागदपत्रावरून Scan करूनच ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

महाडीबीटी पोर्टलवरील सर्व विविध योजनांसाठी जे पात्र विद्यार्थी विहीत केलेल्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना सन २०२२-२३ साठी संबंधीत शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

म. कळावे

आपला विश्वासु

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव,
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रत माहितीसाठी
१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव, विभाग जळगाव.
२. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
३. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि जळगाव.
४. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
५. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौ उमवि, जळगाव.

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

उमविनगर, जळगाव – ४२५००१ (महाराष्ट्र) भारत

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**डॉ. विनोद प्र. पाटील**

कुलसचिव

जा.क्र.कबचौउमवि/०८/ सेंट्रल सेक्टर शिष्य./२०२२-२३ / ५७८ दि. २०/०९/२०२२

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)
(कालमर्यादित दि. ३०/१०/२०२२)

प्रति,
१. मा. प्राचार्य / मा. संचालक,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था.
२. मा. संचालक / विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणीक प्रशाळा / विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२२-२३ साठी अंमलबजावणी करणे बाबत.**

संदर्भ:- १) मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-2022-23/ सीएसएस/१००४७ दि. २७/०७/२०२२
२) मा. सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्र. स.सं.उ.शि./सेंट्रल सेक्टरशिष्य./२०२२-२३/३०९८ दि. २८/०७/२०२२
३) मा. सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्र. स.सं.उ.शि./केंद्र शा.पु.सेंट्रल सेक्टर शिष्य./२०२२-२३/३५८२ दि. ०६/०९/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०२२-२३ मध्ये आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील /, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सर्व प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना **"१०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना २०२२-२३"** या शिष्यवृत्तीचा लाभ घेता यावा यासाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील **www.scholarships.gov.in** या संकेत स्थळावर नवीन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले शिष्यवृत्ती अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नसल्याने जे विद्यार्थी विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता योणार नाही असे कळविण्यात आले आहे.

वरील संदर्भिय परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील/, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभागातील सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत सर्व पात्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून, शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदत दि. ३०/१०/२०२२ अशी निर्धारीत करण्यात आलेली असल्याने ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत व आवश्यक ते सर्व कागदपत्र Scan करून upload करणेबाबत सुचना देण्यात याव्यात. तसेच सोबत जोडलेल्या संचालनालयाच्या संदर्भिय परिपत्रकातील अटी व शर्ती प्रमाणे विहीत मुदतीच्या आत दि. ३०/१०/२०२२ पर्यंत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरून घेवून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रकासह महाविद्यालयाकडे प्राप्त करून घेवून त्वरीत विहित मुदतीच्या आत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज फॉरवर्ड करण्यात यावेत, ही विनंती.

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरिल मार्गदर्शक सुचना (Guidelines) व FAQs विद्यार्थ्यांनी काळजीपुर्वक वाचून सदर योजनेबाबतच्या केंद्र शासनाकडील नविन / सुधारित प्राप्त सुचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरचे व संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेत स्थळाचे वेळोवेळी अवलोकन करण्याविषयी विद्यार्थ्यांना सुचित करावे ही विनंती.

**टिप :- विद्यापिठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज वित्त विभागातील शिष्यवृत्ती कक्षात तपासणी साठी विभागप्रमुखांच्या शिफारशींसह तात्काळ विहीत मुदतीच्या आत दि. ३०/१०/२०२२ पर्यंत पाठवावे, ही विनंती.**

**सोबत:- संदर्भिय परिपत्रक**

आपला विश्वासू,
(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी
१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, म.रा. पुणे.
२. मा. सहसंचालक, उ. शि. जळगाव, विभाग जळगाव.
३. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
४. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि जळगाव.
५. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
६. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.

☎ कार्यालय : +९१- २५७ - २२५८४०५, २२५७२११ फॅक्स् : +९१- २५७ - २२५८४०६
ई मेल: registrar@nmu.ac.in वेबसाईट : www.nmu.ac.in

महाराष्ट्र शासन
सहसंचालक,उच्च शिक्षण,
जळगांव विभाग,जळगांव यांचे कार्यालय,जीवनधारा महाराष्ट्र जीवन प्राधीकरण
ईमारत,जळगांव जि.जळगांव
दुरध्वनी क्रं. व फॅक्स क्रं.(०२५७) २२३८५१०, E-mail:-jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र.स.सं.उ.शि./ सेंट्रल सेक्टरशिष्य./२०२२-२३/ 3098 दिनांक- २८/०७/२०२२२

प्रति,

१. कुलसचिव,
क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.

२. कुलसचिव,
एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई.

३. सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित, व विना अनु. कायम विनाअनुदानित,
कला,वाणिज्य, विज्ञान आणि विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
जळगांव, धुळे, नंदुरबार.

**विषयः- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२२-२३ साठी अंमलबजावणी करणे बाबत..**

संदर्भ :- १.मा.संचालनालयाचे क्र.उशिसं/शिष्य./ २०२२-२३/सीएसएस/१००४७ /दिनांक २७.०७.२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक **(इयत्ता १२ वी )** परिक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चत्तम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची **सेंट्रल सेक्टर** शिष्यवृत्ती योजना, मा. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी क्रेंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत.** या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजूरीचे आणि नुतनिकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नविन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपुर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व मा. संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे.

***किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराचे पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.
४. सदर शिष्यवृत्ती **पदवी व पदव्युत्तर, व्यावसायीक, तसेच बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे.** मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारे व दूरस्थ शिक्षणासाठी ( Diploma Correspondence Courses & Distence Education) ही शिष्यृत्ती लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, **अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी ४ वर्ष व वैद्यकीय, अभ्यासक्रमासाठी व कला, वाणिज्य, व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.**

***अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे-**

- **नविन मंजूरी / (Fresh)-**
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रीका.
  २. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- **नुतनीकरण (Renewal)-**
  १. मागिल वर्षाची गुणपत्रीका

***नविन मंजूरी आणि नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

**१.** सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नुतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या सेकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

**२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ /१० / २०२२ ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक १५/ १५/२०२२ हा आहे.**

३.नविन मंजूरीसाठी (Fresh)- सदर योजनेसाठी SSC,CBSE व ICSE बोर्डचे टॉप २०th Percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फत केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची SSC बोर्डाची विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

**४.** ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

**५.** विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न ( Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

**६.** विद्यार्थ्यांचे बँकखाते चालू स्थितीत असणे (Operative /Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरुन शिष्यवृत्ती

रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जाईंट खाते नसावे.
खाते क्रमांक व इतर बँक तपशिल भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील.

८.ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करावी.

१०.ऑनलाईन अर्ज भरतांना विद्यार्थ्यांना काही अडचण निमार्ण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

११.एखाद्या पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल.

१२.एखाद्या पात्र विद्यार्थ्याचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. ( परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.

## *विद्यापीठ / महाविद्यालय / सस्थेसाठी सूचना :-

विद्यार्थ्यांनी नविन मंजूरीचा (Fresh)- किवा नुतनीकरणाचा (Renewal)- चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुन देण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांनी, विभागाने दिलेल्या युजर आयडी व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे, व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२२-२३ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत कुलसचिव / प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

वरील नमुद सुचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. शिष्यवृत्तीपासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

सहसंचालक,
उच्च शिक्षण,
जळगांव विभाग, जळगांव

प्रत- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षणसंचालनालय, म.रा.पुणे-१

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ /२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०२२-२३/सीएसएस/ १८५७ दि. २५.०७.२०२२

27 JUL 2022

**परिपत्रक**

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२२-२३ साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

उच्च माध्यमिक ( इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७ इतके** नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर,२०२२ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे.

❖ किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.
४. सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

❖ अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-

- नवीन मंजूरी / (Fresh)-
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.
  २. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

- नूतनीकरण (Renewal)-

१. मागील वर्षाची गुणपत्रिका.

❖ नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२२ ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जांची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक १५.११.२०२२ ही आहे.

३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) सदर योजनेसाठी SSC, CBSE व ICSE बोर्डचे टॉप २०$^{th}$ Percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फत केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची SSC बोर्डचे विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबूकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोकड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. विद्यार्थ्यांचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative/Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील.

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

११. एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

१२. एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

❖ विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुण देण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२२-२३ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

तरी आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

( डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
१. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, मोसलेनगर, पांबुर्डा, पुणे ०५
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई ०१
३. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
४. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

# महाराष्ट्र शासन

**सहसंचालक,उच्च शिक्षण,**
**जळगांव विभाग,जळगांव यांचे कार्यालय,जीवनधारा**
**महाराष्ट्र जीवन प्राधीकरण ईमारत,जळगांव जि.जळगांव**

**दुरध्वनी क्रं. व फॅक्स क्र.(०२५७) २२३८५१०,** **E-mail:-jdhe_jal@yahoo.co.in**

जा.क्र.स.सं.उ.शि./केंद शा.पु. सेंट्रल सेक्टर शिष्य./ २०२१-२२/३५४२ दिनांक- ०६/०९/२०२२

प्रति,

१. म. कुलसचिव,
कवयित्री बहीणाबाई चौधरी,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.

२. सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित,व विना अनु.कायम विनाअनुदानित,
कला,वाणिज्य, विज्ञान आणि विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
जळगांव, धुळे , नंदुरबार.

विषय - **सन २०२२-२३ मध्ये सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनांचे महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांचे नुतनिकरणाचे अर्ज भरणेबाबत..**

संदर्भ- मा.शिक्षण संचालक, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/क्रेंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती/११२६९/ दिनांक- ०६.०९.२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये नुतनिकरण अर्ज करण्याकरीता दिनांक २०.०७.२०२२ पासून नॅशनॅल स्कॉलरशिप पोर्टल चालू करण्यात आले आहे. या योजने अंतर्गत देशभरातून १.८० लाख विद्यार्थी नुतनिकरण अर्ज करण्यास पात्र आहेत. यापैकी महाराष्ट्र राज्यातील ११,९९७ विद्यार्थी नुतनिकरण अर्ज करण्यास पात्र आहेत.

त्यानुसार पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी ईमेलवर पाठविण्यात येत आहे. तरी पात्र विद्यार्थ्यांचे नुतनिकरणाचे अर्ज दिनांक ३१.१०.२०२२ पर्यत त्वरीत भरुन घेण्यात यावेत. तसेच उक्त अर्ज करण्याची अंतिम मुदती पर्यंत न चुकता पात्र अर्ज तात्काळ पुढील टप्यावर पाठविण्यात यावे. एकही अर्ज विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर प्रलंबित राहू नये. सदर शिष्यवृत्तीचे नुर्तानिकरणाचे अर्ज प्रलंबित राहिल्यास विद्यापीठाचे कुलसचिव/ महाविद्यालयीन प्राचार्य यांची राहील याची नोंद घ्यावी.

सहसंचालक,
उच्च शिक्षण,
जळगांव विभाग, जळगांव.

**प्रत-** मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**डॉ. विनोद प्र. पाटील**

कुलसचिव

जा.क्र.कबचौउमवि/०८/ केंद्र पुरस्कृत अल्प. शिष्य./ २०२२-२३ / ५७७ दि.२०/०९/२०२२

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)
(कालमर्यादित दि. ३०/१०/२०२२)

प्रति,
१. मा. प्राचार्य / मा. संचालक,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था.
२. मा. संचालक / विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणीक प्रशाळा / विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**विषय :- केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ साठी अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ:- १) मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-2022-23/ केंद्र पुरस्कृत अल्प. शिष्यवृत्ती / १००४५ दि. २७/०७/२०२२
२) मा. सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्र. स.सं.उ.शि./केंद्र शा पो. मॅट्रिक शि/२०२२-२३/३०९७ दि. २८/०७/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०२२-२३ मध्ये आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील /, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील **सर्व प्रवेशित मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील गुणवान पात्र विद्यार्थ्यांना "केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३"** या शिष्यवृत्तीचा लाभ घेता यावा यासाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील **www.scholarships.gov.in** या संकेत स्थळावर **नवीन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal)** शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले शिष्यवृत्ती अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नसल्याने जे विद्यार्थी विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता योणार नाही असे कळविण्यात आले आहे.

वरील संदर्भिय परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील /, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत सर्व मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील गुणवान पात्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून, शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदत दि. ३०/१०/२०२२ अशी निर्धारीत करण्यात आलेली असल्याने ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत व आवश्यक ते सर्व कागदपत्र Scan करून upload करणेबाबत सुचना देण्यात याव्यात. तसेच सोबत जोडलेल्या संचालनालयाच्या **संदर्भिय परिपत्रकातील अटी व शर्ती प्रमाणे विहीत मुदतीच्या आत दि. ३०/१०/२०२२ पर्यंत** ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरून घेवून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रकासह महाविद्यालयाकडे प्राप्त करून घेवून त्वरीत विहित मुदतीच्या आत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज फॉरवर्ड करण्यात यावेत, ही विनंती.

**टिप :- विद्यापिठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज वित्त विभागातील शिष्यवृत्ती कक्षात तपासणी साठी विभागप्रमुखांच्या शिफारशींसह तात्काळ विहीत मुदतीच्या आत दि. ३०/१०/२०२२ पर्यंत पाठवावे, ही विनंती.**

**सोबत:- संदर्भिय परिपत्रक**

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी
१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, म.रा. पुणे.
२. मा. सहसंचालक, उ. शि. जळगाव, विभाग जळगाव.
३. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
४. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि जळगाव.
५. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
६. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.

महाराष्ट्र शासन
सहसंचालक,उच्च शिक्षण,
जळगांव विभाग,जळगांव यांचे कार्यालय,जीवनधारा महाराष्ट्र जीवन प्राधीकरण
ईमारत,जळगांव जि.जळगांव
दुरध्वनी क्रं. व फॅक्स क्रं.(०२५७) २२३८५१०, E-mail:-jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र.स.सं.उ.शि./केंद्र शा.पो. मॅट्रिक शि/२०२२-२३/ 3097 दिनांक- २८/०७/२०२२

प्रति,

१. कुलसचिव,
क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.

२. कुलसचिव,
एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई.

३. सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित,व विना अनु.कायम विनाअनुदानित,
कला,वाणिज्य, विज्ञान आणि विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
जळगांव, धुळे , नंदुरबार.

**विषयः- केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी पोष्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ च्या अंमलबजावणी बाबत..**

संदर्भ :- १.मा.संचालनालयाचे क्र.उशिसं/शिष्य./केंद्र शा.पु.अल्प.शि./२०२२-२३/१०४५/ दिनांक २७.०७.२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्यातील **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील गुणवान विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरीता क्रेंद्र शासन पुरुस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ साठी राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.** यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनिकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. फक्त ऑनलाईन (Online) पध्दतीने भरलेले अर्ज स्विकारले जातील. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (offline) अर्ज स्विकारले जाणार नाही. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी केंद्रशासनाने नविन **(Fresh) शिष्यवृत्तीसाठी** ४७५७५ संच (Quota)निर्धारित केलेले असून त्यातील ३० टक्के संच मुलींसाठी राखीव आहेत. नुतनीकरणासाठी संच निर्धारीत नसतात. सदर शिष्यवृत्तीचा निधी १०० टक्के केंद्रशासनाकडून वितरीत करण्यात येतो. विद्यार्थ्यांस मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम (Corse/ Tution fee and maintenance allowance) केंद्रशासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येईल.

तरी विद्यापीठ अधिनस्त असलेल्या जळगांव, धुळे, नंदुरबार जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत सूचना देण्यात याव्या.

सोबत-मा.संचालनालयाचे परिपत्रक

सहसंचालक,
उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ E-mail: schol.dhepune@gov.in
फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं-२०२२-२३/केंद्र पुरस्कृत अल्प.शिष्यवृत्ती/ 10045
दिनांक- २६.०७.२०२१

**परिपत्रक**

27 JUL 2022

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ साठी अंमलबजावणी करणे बावत.**

**संदर्भ :-** केंद्रशासनाचे पत्र क्र. SS-१५/०४/२०२१-Scholarship-MoMA

राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील **गुणवान विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०२२-२३ साठी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.** यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. फक्त ऑनलाईन (Online) पध्दतीने भरलेले अर्ज स्विकारले जातील. **कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारले जाणार नाहीत.** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४७५७५ संच (Quota) निर्धारित केलेले असून त्यातील ३० टक्के संच मुलींसाठी राखीव आहेत. नूतनीकरणासाठी संच निर्धारीत नसतात. सदर शिष्यवृत्तीचा निधी १०० टक्के केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येतो. विद्यार्थ्यांस मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम (Course / Tution fee and maintenance allowance) केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT mode) जमा करण्यात येईल.

### ❖ शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :

११ वी ते पीएच्.डी ,व्यावसायिक, (डी.एड्., बी.एड्., एम.एड्., आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रम (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

### ❖ किमान पात्रता व अटी :

१.) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२.) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३.) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.
४.) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.

५.) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमात शिकत असणे आवश्यक आहे.

६.) एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

७.) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.

८.) विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी १ वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :**

१) विद्यार्थ्याचा फोटो

२) मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.(Self Attested)

३) महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थी त्या महाविद्यालयात असल्याबाबतचे तसेच Day scholars / hosteller याबाबतची पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institution Verification Form FAQs) सोबत देण्यात आलेला आहे.

४) पालकाचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

५) अल्पसंख्यांक समुदायाबाबतचे स्वत: प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र,१८ वर्षाखालील विद्यार्थ्यासाठी त्यांच्या पालकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

६) महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.

७) बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

८) रहिवासी प्रमाणपत्र. (Residential/Domicile Certificate)

९) आधार कार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत सदर कागदपत्रे महाविद्यालयात अर्ज तपासणीसाठी त्वरीत सादर करावी. महाविद्यालयांनी सदर कागदपत्रे काटेकोरपणे तपासुन ऑनलाईन अर्जावर पुढील कार्यवाही करावी व सदर कागदपत्र त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी.

रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सर्व कागदपत्र UPLOAD करणे आवश्यक आहे, तसेच महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह UPLOAD करण्यात यावी.

❖ **अर्ज करण्याची पध्दत (नविन मंजुरी /नुतनीकरण):**

१. अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. National Scholarhips (NSP) या मोबाईल अॅपची सुविधा देखील अर्ज भरण्यासाठी देण्यात आलेली आहे.

३. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थीनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील Guidelines व Frequently Asked Questions (FAQ) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करून घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनियार्य आहे.

५. विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे त्या अभ्यासक्रमाच्या प्रथमवर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होई पर्यंत विद्यार्थ्याने नूतनीकरणासाठीच अर्ज भरावा.

❖ महाविद्यालय / संस्थांसाठी सूचना :

१. विद्यार्थ्याने महाविद्यालयात चालू वर्षात प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे.

२. **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०२२ ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम दि. १५/११/२०२२ ही आहे.**

३. विद्यार्थ्याने वसतीगृहात रहात असल्याचे अर्जात नमूद केलेले असल्यास त्याबाबतची खात्री संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या कायमस्वरूपी पत्त्यावरून करावी.

४. महाविद्यालयांनी संकेतस्थळाच्या Homepage वरील Guidelines व Frequently Asked Question (FAQs) बाबत व्यवस्थित माहिती करुन घेऊन त्यानुसार विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात.

५. विद्यार्थ्यास प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर तो अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्याने नुतनिकरणाचा अर्ज भरल्याची खात्री करण्यात यावी.

६. सर्व महाविद्यालय/संस्था यांनी त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत अभ्यासक्रमनिहाय फी नमुद करुन Profile update करावे.

७. महाविद्यालय/संस्थानी प्रत्येक विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अर्ज तपासणी करतांना विद्यार्थ्यांचे Fee Details तपासून बरोबर नसल्यास त्यात दुरुस्ती (Edit) करावे.

❖ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना बँक तपशील भरण्याबाबत सूचना :

१. विद्यार्थ्याने (Drop Down List) मधून त्यांच्या बँक / शाखेचे नाव काळजीपूर्वक निवडावे.

२. त्यानंतर विद्यार्थ्याने त्यांचा बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड अचूक भरावा. विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड बाबत त्यांच्या बँकेकडून खात्री करून घ्यावी.

३. विद्यार्थ्यांचा बँक खाते क्रमांक चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

४. विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक (Core bank facility) असलेल्या (Scheduled) बँकेचाच असणे आवश्यक आहे.

५. बँक खाते विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे.

६. केंद्रशासनाच्या सूचनांनुसार ज्या विद्यार्थ्यांचे बँक तपशिल चुकीचे असतील अथवा त्यांच्या बँकेने त्यांचे बँक खाते प्रमाणित केले नाही (Incorrect / Not validate) तर त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झालेली असेल तरी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम जमा होणार नाही /रद्द होईल.

७. NSP Portal वर सर्व पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकतात तसेच ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्ष व त्या पुढील आहे त्यांनी आपले बँक खाते क्रमांक आधार कार्डला लिंक करणे आवश्यक आहे. तरच शिष्यवृत्तीची रक्कम ( Fresh & Renewal) लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होईल.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करून त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करून पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावेत.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी तसेच याबाबतच्या वेळोवेळी नविन प्राप्त होणाऱ्या सूचनांसाठी www.scholarships.gov.in व www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.सदरचे संकेतस्थळ हे www.minorityaffairs.gov.in व www.dhepune.gov.in या संकेतस्थळाशी देखील जोडलेले (Link) आहे. तसेच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथे दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ / २९७०७०९८ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

तरी आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सूचना देण्यात याव्यात. व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य पुणे-०१

प्रत- माहिती व कार्यवाहीस्तव,

आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना दि.१०/०८/२०२२ पूर्वी याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,०३ महापालिका मार्ग ,मुंबई
२. मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार,मुंबई
३. मा.संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग ,मुंबई.
४. मा.संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,भांबुर्डा,पुणे.
५. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१
६. कुलसचिव,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,म्हसरुळ,वणी ,दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.
७. कुलसचिव,महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ,फुटाला लेक,नागपूर ४४० ००१
८ .मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१-.
यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.
८. कुलसचिव,सर्व कृषि /अकृषि /अभिमत विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.

File No.11014/21/2006-BC-I
Government of India
Ministry of Social Justice & Empowerment
***

Shastri Bhawan, New Delhi,
Dated : 11th August, 2011

To

The Principal Secretaries/Secretaries in-Charge of OBC Welfare,
All States/UTs

**Subject: Revision of the Centrally Sponsored Scheme of Post-Matric Scholarship for students belonging to OBCs (PMS-OBC).**

**Sir,**

The Government of India has been implementing the Scheme of Post-Matric Scholarship to students belonging to OBCs since 1998. It aims to provide financial assistance to students belonging to OBCs for pursuing post-matriculation courses through recognized institutions. Under the Scheme, Central Assistance is provided on 100% basis to all States/UTs over and above their respective "committed liability" except in the case of North Eastern States, which are exempted from committed liability.

2. Components of the Scheme include:
   (i) maintenance allowance;
   (ii) reimbursement of non-refundable compulsory fee charged by educational institutions; and
   (iii) certain other allowances.

3. The Scheme has now been revised **w.e.f. 01.07.2011.** The revision consists of the following:-

I. Changes in (i) income ceiling; (ii) grouping of courses; and (iii) rates of maintenance and other allowances, as per details given in para 4 below, and

II. The Scheme was, to begin with, meant to be open-ended, but has, in practice, been implemented subject to allocation available for it. This "Funds-Limited" nature is now being formalized, as per details given in para 5 below.

Hi,

**We have done following changes in system as per directions from directorate office for OBC/SBC/VJNT. These changes are applicable for students belong to OBC/SBC/VJNT Caste.**

**Please refer excel sheet 'Course Group Detail Information' which is available on website.**

**Courses with course group as 'Z'**

**a. Student cannot save the applications or applications will not be processed for the courses with course group as 'Z'**

| Sr. No. | Course ID | Course Name | Duration (Months) | Course Type ID | Course Type | Course Group ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | SC | VJNT/OBC/SBC |
| 1 | 68 | Bachelor of Business Administration. | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 2 | 69 | Bachelor of Business Administration | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 3 | 70 | Bachelor of Business Management | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 4 | 72 | Bachelor of Business Management (e Commerce) | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 5 | 75 | Bachelor of Computer Application | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 6 | 76 | Bachelor of Computer Application (Science) | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 7 | 77 | Bachelor of Computer Application (Management) | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 8 | 98 | Bachelor of Management Studies | 36 | 3 | Graduate Course | 2 | Z |
| 9 | 135 | Banking Insurance | 36 | 3 | Graduate Course | 2 | Z |
| 10 | 143 | Certificate Course In Information Technology | 36 | 7 | Under Graduate Course | 4 | Z |
| 11 | 147 | Chemical Engineering (CH) | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 12 | 148 | Computer Application (MET-CA) | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 13 | 158 | Diploma in 3D/Animation & Graphics | 24 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 14 | 215 | Doctor of Medicine | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 15 | 217 | Doctor of Philisophy | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 16 | 221 | Dress Designing & Garment Manufacturing | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 17 | 224 | Fashion Design | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 18 | 242 | L. L. B. (2 Years) | 24 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 19 | 284 | Master of Computer Applications (Appl Elect.) | 24 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 20 | 286 | Master of Dental Surgery | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 21 | 397 | Post S.S.C. Diploma | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 22 | 414 | Bachelor of FINANCIAL MARKET | 36 | 3 | Graduate Course | 3 | Z |

| Sr. No. | Course ID | Course Name | Duration (Months) | Course Type ID | Course Type | Course Group ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | SC | VJNT/OBC/SBC |
| 23 | 415 | Bachelor of Science (AVIATION) | 36 | 3 | Graduate Course | 3 | Z |
| 24 | 424 | M.D. (Hom) Regular P.G. Course | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 25 | 467 | B.C.C.A -Bachelor Of Commerce With Computer Application | 36 | 3 | Graduate Course | 3 | Z |
| 26 | 500 | Bachleor Of Banking Insurance | 36 | 3 | Graduate Course | 2 | Z |
| 27 | 527 | Master of Business Administration Part Time | 24 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 28 | 557 | PHD | 12 | 5 | Post Graduate Course | 1 | Z |
| 29 | 564 | Bachlor Of Banking & Finance | 36 | 3 | Graduate Course | 2 | Z |
| 30 | 568 | Diploma In Administration | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 31 | 576 | P.G.Diploma In Computer Application Technology | 24 | 6 | Professional Course | 3 | Z |
| 32 | 602 | Master In E- Commerec | 24 | 5 | Post Graduate Course | 2 | Z |
| 33 | 614 | By Research | 48 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 34 | 626 | B. Lit | 36 | 3 | Graduate Course | 3 | Z |
| 35 | 666 | Post Graduate Diploma in Computer Commerercial App | 24 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 36 | 674 | Master of Occupational Therapy | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 37 | 675 | Master of Physical Therapy | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 38 | 694 | Bachelor of Computer Management | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 39 | 715 | MD Anaesthesia | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 40 | 716 | MD Anatomy | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 41 | 717 | MD Biochemistry | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 42 | 718 | MD Forenci Medicine | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 43 | 719 | MD Gen.Medicine | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 44 | 720 | MD Microbiology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 45 | 721 | MD Paediatrics | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 46 | 722 | MD Pathology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 47 | 723 | MD Pharmacology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 48 | 724 | MD Physiology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 49 | 725 | MD COMMUNITY MEDICINE | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |

| Sr. No. | Course ID | Course Name | Duration (Months) | Course Type ID | Course Type | Course Group ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | SC | VJNT/OBC/SBC |
| 50 | 726 | MD Psychiatry | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 51 | 727 | MD Pulmonary Medicine | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 52 | 728 | MD Radiology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 53 | 729 | MD Skin & VD | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 54 | 730 | MS OTO- RHINO-LARYNGOLOGY | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 55 | 731 | MS Gen.Surgery | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 56 | 732 | MS Ophtalmology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 57 | 733 | MS Orthopaedics | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 58 | 734 | MD TRANFUSION MEDICINE | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 59 | 735 | MS Obstetrics & Gynaecology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 60 | 746 | M.Ch. Plastic Surgery | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 61 | 747 | M.Ch.C.V.T.S. | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 62 | 748 | M.Ch.Neuro Surgery | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 63 | 749 | M.Ch. Paediatric Surgery | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 64 | 750 | M.Ch. Urology | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 65 | 751 | MASTER OF PHYSIOTHERAPY | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 66 | 816 | Doctor In Medicine (Chest & TB) | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 67 | 817 | Master Of Surgery MS.ENT ( Otorhinolaryngology) | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 68 | 818 | Doctor In Medicine (Preventive Social Medicine) | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |
| 69 | 830 | Bachelor Of Arts ( ANIMATION) | 36 | 3 | Graduate Course | 3 | Z |
| 70 | 834 | U.G.Diploma In Computer Application Technology | 24 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 71 | 836 | U.G.Diploma In Interior Design | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 72 | 851 | Diploma In Computer Technology (Second Shift) | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 73 | 889 | M.Phil | 24 | 5 | Post Graduate Course | 1 | Z |
| 74 | 920 | PHD (COMPUTER SCI.) | 36 | 5 | Post Graduate Course | 1 | Z |
| 75 | 930 | I . T. I . (3) | 36 | 6 | Professional Course | 4 | Z |
| 76 | 956 | Bachelor of computer science | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 77 | 961 | Bachelor of Computer Science (General) | 36 | 6 | Professional Course | 2 | Z |
| 78 | 984 | Master Of Fashion Designing | 36 | 6 | Professional Course | 1 | Z |